**-: प्रेसनोट दिनांक 01/12/2021 :-**

**1. सुधीर हमिदचंद चौधरी, वय - 45 वर्षे, कनिष्ठ लिपीक,ग्रामीण रुग्णालय, हातकणंगले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर वर्ग - 3,रा.रुक्मिणी हौसिंग सोसायटी प्लॉट नं.12,संजयनगर , सांगली, 2.सचिन शिवाजी भोसले, रा.नेज, ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर, 3.सौरभ अरविंद नेर्ले, वय - 24, रा. नेज, ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर यांचेतील अ.न.1 व 2 यांनी लाच मागणी करुन अ.न.3 यांनी लाच स्विकारलेबाबत.......**

---

तक्रारदार पृथ्वीराज पाटील यांचा विवाह एप्रिल 2021मध्ये झाला असुन त्यांनी विवाह नोंदणी करणेकरीता सप्टेंबर 2021 मध्ये नगरपंचायत हातकणंगले येथे अर्ज करणार होते. परंतु कोरोना रोगाच्या अनुशंघाने नगरपंचायत हातकणंले यांनी सदरचे नोंदणी करण्याचे काम ग्रामीण रुग्नालय, हातकणंगले येथील श्री चौधरी यांचेकडे दिलेले आहे म्हणुन तक्रारदार यांनी ग्रामीण रुग्नालय हातकणंगले, येथे विवाह नोंदणीचा अर्ज केलेला होता. विवाह नोंदणीचे काम पुर्ण न झालेने तक्रारदार हे चौधरी यांना भेटले असता त्यांनी त्यांचेकडे काम करणारा सचिन भोसले यांना भेटण्यास सांगीतले तक्रारदार भोसले यांना भेटले असता भोसले यांनी चौधरी यांचेसाठी 3000/- रुपये द्यावे लागलील असे म्हणुन लाचेची मागणी केली. त्यानंतर तक्रारदार यांनी दिनांक 22/10/2021 रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे सुधीर चौधरी व सचिन भोसले यांच्याविरूध्द तक्रार दिली होती.

तक्रारीप्रमाणे पडताळणी केली व पडताळणीमध्ये सुधीर चौधरी व सचिन भोसले यांनी तक्रारदाराकडे 3000/- रुपये लाचेची मागणी केलेचे निषन्न झाले.

त्याप्रमाणे सापळा कारवाई आयोजीत केली असता दिनांक 01/12/2021 रोजी हातकणंगले येथे पंच साक्षीदारांचे समक्ष तक्रारदार यांचे विवाह नोंदणीचे काम करुन देणेसाठी सुधीर चौधरी व सचिन भोसले यांनी सौरभ नेर्ले यांचे मदतीने 3000/- रूपये लाच रक्कम स्विकारलेने त्यांना रंगेहाथ पकडणेत आले आहे. सदरबाबत 1. सुधीर अमितचंद चौधरी, वय - 45 वर्षे, कनिष्ठ लिपीक,ग्रामीण रुग्णालय, हातकणंगले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर वर्ग - 3,रा.रुक्मिणी हौसिंग सोसायटी प्लॉट नं.12,संजयनगर , सांगली, 2.सचिन शिवाजी भोसले, रा.नेज, ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर, 3.सौरभ अरविंद नेर्ले, वय - 24, रा. नेज, ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर यांचेविरूध्द हातकणंगले पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करणेची प्रक्रीया सुरू आहे.

सदरची कारवाई मा. श्री राजेश बनसोडे, पोलीस उपआयुक्त/ पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे, मा. सुरज गुरव, अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे, मा. श्री सुहास नाडगौडा, अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांचे मार्गदर्शनाखाली श्री आदिनाथ बुधवंत, पोलीस उपअधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो कोल्हापूर, सपोफौ संजीव बंबरगेकर, पोना विकास माने, पोना सुनिल घोसाळकर, पोकॉ रूपेश माने, चापोहेकॉ सुरज अपराध, अॅन्टी करप्शन ब्युरो कोल्हापूर यांनी केली आहे.

सर्व नागरिकांना आवाहन करणेत येते की, लाचेच्या अथवा अपसंपदेबाबत तकारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील कंमाकावर संपर्क साधावा.

१) मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री कमांक :- १/८००२२२०२१

२) मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी कमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.

३) श्री.आदिनाथ बुधवंत, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर मो.नं. ९०११२२८३३३,

४) कार्यालय दुरध्वनी कमांक - ०२३१/२५४०९८९. ५)हेल्पलाईन टोल फ्री कमांकः- १०६४,

५) व्हॉटस अप कमांक :- ७८७५३३३३३३.

Scanned by TapScanner